# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.10.2023** **वार – मंगळवार**

---

**विज्ञान भारती**

विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र विभाग, भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमी आणि भारतीय उष्णप्रदेशीय हवामानशास्त्र संस्थेनं 'विज्ञान वीस' बैठकीतील चर्चांवर आधारित परिसंवादाचं आज पुण्यात आयोजन केलं होतं. शाश्वत विकासासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेशाला पोषक वातावरणनिर्मिती, अशी या परिसंवादाची मध्यवर्ती संकल्पना होती. चांगल्या भवितव्यासाठी स्वच्छ ऊर्जा, वैश्विक स्तरावर सर्वांगीण आरोग्य आणि लोकाभिमुख विज्ञान-तंत्रज्ञान संस्कृती विकसित करण्यावर भर देण्याची आवश्यकता आहे, असा सूर वैज्ञानिकांच्या या परिसंवादात उमटला. मान्यवर तज्ञ वैज्ञानिक, संशोधक, शास्त्रज्ञ आणि विज्ञानप्रेमी या परिसंवादाला उपस्थित होते.

**सेवाभवन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या 'सेवा भवन' या प्रकल्पातील सर्व सेवा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या सेवांचं उद्घाटन दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक आणि विश्वस्त डॉ. धनंजय केळकर यांच्या हस्ते करण्यात आलं. सेवा भवनमध्ये अठरा रुग्ण क्षमतेचं जनकल्याण डायलिसिस केंद्र, तसंच रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी दिवंगत डॉक्टर आनंदीबाई जोशी निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रकल्पात रुग्ण आणि नातेवाईकांसाठी जनकल्याण स्वास्थ्य सल्ला, मार्गदर्शन, समुपदेशन केंद्रही सुरू करण्यात आलं आहे. या सर्व सेवा अत्यल्प शुल्कात चालवल्या जाणार आहेत.

**एसटी**

बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक या उपक्रमांतर्गत एसटीच्या पुणे विभागात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी सहभाग घेऊन आपलं आगार, बसस्थानक स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. आजपासून येत्या 14 ऑक्टोबरदरम्यान ही स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे. पुणे विभागाचे नियंत्रक कैलास पाटील यांनी ही माहिती दिली.

**पुरस्कार**

नांदेडमध्ये नुकत्याच पार पडलेल्या अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या राज्य अधिवेशनात ज्येष्ठ कार्यकर्ता पुरस्कार पुण्याच्या श्रीपाल ललवाणी यांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक आणि मानसोपचारतज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झालं.

**रोहित पवार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार युवा संघर्ष यात्रा काढणार आहेत. रोहित पवार यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. राज्यातील बेरोजगार तरुण, स्पर्धा परीक्षा देणारे युवा, पदवीप्राप्त असूनही काम नसणारे विद्यार्थी, आर्थिक अडचण असलेले विद्यार्थी या सर्वांच्या समस्यांना आवाज देण्यासाठी, तुळापूरला छत्रपती संभाजीमहाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन ही यात्रा सुरु होणार आहे. 820 किलोमीटर अंतराची ही यात्रा 24 ऑक्टोबरला म्हणजेच दसऱ्यापासून सुरू होणार आहे.

**मांडव**

पुण्यातील गणेश मंडळांनी दिलेल्या मुदतीत म्हणजेच दोन दिवसांत मांडव, कमानी न काढल्यामुळे 22 मंडळांचे मंडप काढण्यात आले आहेत. त्याचबरोबर मुदतीत मंडप न काढणाऱ्या मंडळांना नोटीस बजावण्यात येईल असं पुणे महापालिकेचे सहआयुक्त आणि अतिक्रमण विभागाचे प्रमुख माधव जगताप यांनी सांगितलं.

**महावितरण**

बेकायदा वीज जोडणी घेणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांवर कारवाई करण्याचा इशारा महावितरणनं दिला असतानाही पुण्यातील सुमारे 90 टक्के मंडळांनी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याचं दिसून आलं आहे. पुण्यात छोटी मोठी अशी सुमारे 3800 सार्वजनिक गणेश मंडळं आहेत, त्यापैकी 100 गणेश मंडळांनी कायमस्वरुपी वीजजोडणी घेतली आहे; आणि यंदा केवळ 375 गणेश मंडळांनीच महावितरणकडून तात्पुरती अधिकृत वीज जोडणी घेतल्याची आकडेवारी समोर आली आहे.

**क्रीडा**

पुणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत किशोरी गटात लोक श्री क्रीडा ज्ञानपीठ, सह्याद्री क्रीडा प्रतिष्ठान, एम एच स्पोर्ट्स या संघांनी तर महिला गटात प्रकाश तात्या बालवडकर कबड्डी संघ, सुवर्णयोग महिला कबड्डी संघ आणि विजयमला कबड्डी संघानं आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत आगेकूच कायम राखली.

**पाणीपुरवठा**

पिंपरी चिंचवड महापालिका जलशुद्धीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्तीचं काम हाती घेणार असल्याने येत्या गुरुवारी संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. शुक्रवारी सकाळी कमी दाबाने पाणीपुरवठा होईल असं पाणीपुरवठा विभागानं कळवलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात कालपासून पावसाने काहीशी विश्रांती घेतली आहे. राज्यावरील कमी दाबाचा पट्टा मध्य प्रदेशच्या दिशेनं सरकल्यानं पुण्यात सध्या तरी दमदार पावसाची शक्यता नसल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**